**चालः लग जा गले........**

परोपकारा वाहीले, अवघे जीवन तुम्ही

मानवतेला जाहले, समर्पण तुम्ही........||धृ ||

अंगीकारूनी स्वःता, दुज्या मग बोधले

केले आधी मग तुम्ही, करवून घेतले

ऐकून आधी वर्तले, मग ते वचन तुम्ही

मानवतेला जाहले...........||१||

दिनदुबळया दुखी जीवा, ओढीयले समीप

त्या ह्रदयी तेवविले, अध्यात्म ज्ञान दिप

जीवनी तयांच्या फुलविले, भक्ती सुमन तुम्ही

मानवतेला जाहले...........||२||

सान थोरा सन्मानीले, दिधले प्रेम अपार

अथक परिश्रम घेऊनी, केला ज्ञान प्रचार

देशो विदेशी निरंकारी, नेली मिशन तुम्ही

मानवतेला जाहले..........||३||

'एकनाथ' नमले विश्व हे, हरदेवजींच्या पदी

उपकार अगणीत तयांचे, फेडू ना शके कधी

शतकोटी आमुचे स्विकारा, आता नमन तुम्ही

मानवतेला जाहले..............||४||